संस्था प्रत

के.जे. सोमय्या कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नोंदणी क्रमांक - बी.ओ.एम./ डब्ल्युएन/ आरएसआर/ एसआर/1080/ सन 1992

नोंदणीकृत पत्ता - के.जे. सोमय्या कॉलेज कॅम्पस, विद्याविहार (पूर्व), मुंबई - 400 077.

वैधानिक लेखापरिक्षण अहवाल

सन 2021-2022



(1)

SHANTARAM T. GAVHANE

(CERTIFIED AUDITOR, CO-OP. SOCIETIES, PANEL NO. B-2/11386)

4/406, EXCEL ARCADE, OPP. GHATKOPAR TELEPHONE EXCHANGE,
L.B.S. MARG, GHATKOPAR (W.), MUMBAI - 400 086.

Email Id :- gavhaneshantaram@gmail.com **Mob. No. 9322411476**

Ref. No. Date :-

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/कार्यलक्षी संचालक
के.जे. सोमय्या कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स
एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.
के.जे. सोमय्या कॉलेज कॅम्पस, विद्याविहार (पूर्व),
मुंबई - 400 077.

विषय :- वैधानिक लेखापरिक्षण अहवाल दि. 01/04/2021 ते 31/03/2022 या मुदतीचा सादर करणेबाबत.

महोदय,

आपल्या संस्थेचे दि. 01/04/2021 ते 31/03/2022 या मुदतीचे वैधानिक लेखापरिक्षण करुन वैधानिक लेखापरिक्षण अहवाल सोबत जोडला आहे.

सदर अहवालात नमुद केलेल्या दोषांची पूर्तता तसेच दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करुन महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा कायदा 1960 चे कलम 82 अधिनियम 1961 नियम 83 अन्वये ''ओ'' नमुन्यात संचालक मंडळाच्या ठरावासह तीन प्रतीत 3 महिन्याच्या आत दोष दुरुस्ती अहवाल सादर करावा.

कृपया अहवाल प्राप्त झाल्याची पोहच द्यावी.

आपला विश्वासू,

शांताराम तु. गव्हाणे
(प्रमाणित लेखापरिक्षक)
पॅनल क्र. बी-2/11386

स्थळ : मुंबई
दिनांक : 30/07/2022

प्रत माहितीसाठी सविनय सादर :-

1. **मा. उपनिबंधक,** सहकारी संस्था, मुंबई एन विभाग
2. **मा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक -1,** सहकारी संस्था मुंबई

K.J. SOMAIYA COLLEGE OF ARTS & COMMERCE EMPL. CO-OP CREDIT SOCIETY LTD. * REGN. NO. BOM/WW/RSR/CR/1080

-: अनुक्रमणिका :-

संस्थेचे नाव :- के.जे. सोमय्या कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

सन 2021-2022

अ.क्र.	तपशिल	पान क्र.
1	अध्यक्ष/सचिव पत्र	1
2	अनुक्रमणिका	2
3	लेखापरिक्षण नेमणूकीचे पत्र व ठराव	3-4
4	लेखापरिक्षकाचे संमतीपत्र / नो बीन	5-6
5	समरी अहवाल	7
6	फॉर्म नं.1	8-11
7	फॉर्म नं. 8	12-14
8	1 ते 9 बाबींवरील विवेचन	15
9	भाग अ ब क	16-32
10	लेखापरिक्षकाचा दाखला	33-34
11	परिशिष्ठ	35
12	ताळेबंदपत्रक व नफा-तोटा पत्रक	36-37
13	अनुषंगिक याद्या	38-61
14	लेखापरिक्षण वर्गवारीचा तक्ता	62-65

स्थळ : मुंबई
दिनांक : 30/07/2022

शांताराम तु. गव्हाणे
(प्रमाणित लेखापरिक्षक)
पॅनल क्र. बी-2/11386

K.J. SOMAIYA COLLEGE OF ARTS & COMMERCE EMPL. CO-OP. CREDIT SOCIETY LTD.
REGN. NO. BOM/VNVRSR/CR/1080

(3)

K.J.SOMAIYA COLLEGE OF ARTS & COMMERCE EMPLOYEES CO-OP CREDIT SOCIETY LTD

(Regn. No. B.O.M./WN/RSR/CR/10801-9 Year dt.09.05.1992)
Vidyavihar (East), Mumbai – 400 077

Ref.:

Date: - 24/10/2021

प्रति,
श्री. शांताराम तु. गव्हाणे
प्रमाणित लेखापरिक्षक, सहकारी संस्था
मुबंई

विषय : संस्थेचे सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षकाचे नेमणूकीवावत...

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आमची संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम ८१(१) मध्ये येत असल्यामुळे संस्थेच्या सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षणाकरिता संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २२.१०.२०२१ ठराव कं.४ नुसार आपली वैधनिक लेखापरिक्षक म्हणून नेमणूक करण्यात येत आहे. सदर सभेच्या ठरावाची प्रत आपल्या माहितीस्तव सादर करीत आहोत कृपया नोंद घ्यावी.

धन्यवाद

कळावे,
आपले नम्र

K. J. Somaiya College of Arts & Commerce Empl. Co-op. Cr. Soc. Ltd.

Treasurer Secretary Chairman

प्रत माहितीस्तव : विशेष जिल्हा लेखापरिक्षक
सहकारी संस्था,

K.J. SOMAIYA COLLEGE OF ARTS & COMMERCE EMPL. CO-OP CREDIT SOCIETY LTD. * REGN. NO. B.O.M./WN/RSR/CR/10801

K.J.SOMAIYA COLLEGE OF ARTS & COMMERCE EMPLOYEES CO-OP CREDIT SOCIETY LTD

(Regn. No. B.O.M./WN/RSR/CR/10801-9 Year dt.09.05.1992)
Vidyavihar (East), Mumbai – 400 077

Ref.: Date: -

दि. २२.१०.२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसधारण सभेतील ठराव क.४ ची सत्यप्रत

विषय क. ४ ः सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करण्यावावत...

ठराव क. ४ ः " ठराव करण्यात येतो कि, सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी श्री. शांताराम तु गव्हाणे (प्रमाणित लेखापरिक्षक, सहकारी संस्था) पॅनल क.वी - ११३८६ यांची आजच्या सभेत नेमणूक करण्यात येत आहे. नेमणूकी वावतचे पत्र व ठरावाची प्रत त्यांना देण्यात यावी व त्यांचेकडून लेखापरिक्षण करणेवावत संमती पत्र घेण्यात यावे असे सर्वानुमते ठरविण्यात आले."

सूचक ः श्री. भूषण वाडेकर
अनुमेदक ः श्री.मणिलाल यादव
ठराव सर्वानुमते मंजूर

K. J. Somaiya College
of Arts & Commerce
Empl. Co-op. Cr. Soc. Ltd.

Treasurer Secretary Chairman

(5)

SHANTARAM T. GAVHANE

(CERTIFIED AUDITOR, CO-OP. SOCIETIES, PANEL NO. B-2/11386)

4/406, EXCEL ARCADE, OPP. GHATKOPAR TELEPHONE EXCHANGE,
L.B.S. MARG, GHATKOPAR (W.), MUMBAI - 400 086.

Email Id :- gavhaneshantaram@gmail.com **Mob. No. 9322411476**

Ref. No.

Date :- 24/10/2021

-: संमतीपत्र :-

प्रति,

मा. अध्यक्ष / सचिव

के. जे. सोमय्या कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स

एम्प्लॉईज को- ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

के. जे. सोमय्या कॉलेज कॅम्पस, विद्याविहार (पूर्व),

मुंबई - ४०० ०७७.

विषय :- संस्थेचे सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षक नेमणूकीस संमती देणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपल्या संस्थेच्या दि. २२/१०/२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण ठराव क्र. ०४ नुसार माझी वरील कालावधीचे वैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी नेमणूक केलेली असुन संस्थेने मला त्यांच्या दि. २४/१०/२०२१ च्या पत्रानुसार ठरावाच्या सत्य प्रतीसह कळविले आहे.

वरील कालावधीचे लेखापरिक्षण करण्यासाठी मी या पत्राव्दारे संमती देत आहे.

आपला विश्वासू,

S. T. GAVHANE ★ P. No. 11386 ★ Certified Auditor

शांताराम तु. गव्हाणे

(प्रमाणित लेखापरिक्षक)

पॅनल क्र. बी-२/११३८६

K.J. SOMAIYA COLLEGE OF ARTS & COMMERCE EMPL. CO-OP CREDIT SOCIETY LTD.

(6)

SHANTARAM T. GAVHANE

CERTIFIED AUDITOR CO-OP. SOCIETIES. PANEL NO. B-2/11386

4/406, Excel Arcade. Near Telephone Exchange, L.B.S. Marg, Ghatkopar (W.), Mumbai - 400 086.

email id :- gavhaneshantaram @gmail.com Mob No. 9322411476

Bill No. SA/CR/21-22 **Date:- 30/07/2022**

To,
Chairman/ Secretary,
K. J. Somaya College of Arts & Comm. Emp. Co-Op. Credit Society Ltd.
K. J. Somaya Campus, Vidhyavihar (E.),
Mumbai - 400 077.

Sr.No.	Particulars	Amount
1	**For Statutory Auditing the books of accounts for the year ended 31st March 2022**	19,900.00
2	For Internal Auditing the books of accounts for the year ended	
3	For Finalization of accounts for the year ended	
4	For Account writing charges from	
5	Professional Charges	
6	Other Charges	2,500.00
	TOTAL	22,400.00

(In Words Twenty Two Thousand Four Hundred Only)

Bank Name :- M.D.C.C. Bank Ltd.
Account No. :- 00361001001043
Account Type :- Saving A/c
Branch :- Bhatwadi
IFSC Code :- MDCB0680036

For Shantaram T. Gavhane

Authorized Signatory

-: Thank You :-

Please, give Cheque in Favor of " Shantaram T. Gavhane"

K.J. SOMAIYA COLLEGE OF ARTS & COMMERCE EMPL. CO-OP. CREDIT SOCIETY LTD. REGN. NO. BOM/ WW/RSR/CR/1080

-: समरी अहवाल :-

संस्थेचे नाव :- के.जे. सोमय्या कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

सन :- 2021-2022

अ) संस्था करीत असलेली चुकीची कामे / व्यवहार जे संस्थेने त्वरीत बंद करणे आवश्यक आहे अशा बाबी.

1. संस्थेने कर्जदाराचे पूर्वीचे कर्ज 50 टक्केपेक्षा जादा वसुल झाल्याशिवाय नवीन कर्ज मंजुरी करु नये.
2. नियमीत वर्गणीमधुन वसुल करणेत आलेल्या आवर्त ठेव ची रक्कम सभासदांना मागणीप्रमाणे अदा करणेत आलेचे व त्यांना शिल्लक रकमेवर नियमीत दराने व्याज अदा करण्यात आले आहे.
3. उपविधी क्र. फ 1.10 (3) नुसार लघु मुदत कर्ज वाटप मर्यादा रु.20,000.00 असुन संस्था रु. 50,000.00 वाटप करत आहे.

ब) आवश्यक व उपयुक्त बाबी ज्या संस्थेने करणे आवश्यक आहे.

1. संस्थेचा सीडी रेशो 65 ते 70 टक्के दरम्यान राखण्यात यावे.
2. एकूण ठेवीच्या 30 ते 35 टक्के तरलता म्हणुन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत मुदत ठेवीत गुंतविणे.
3. रोख रक्कम हाताळणाऱ्या इसमांची जबाबदारी निश्चित करुन सदर इसमाकडुन जामीनरोखा व जामीन अनामत रक्कम घेणे.
4. संस्थेच्या सर्व संचालक मंडळाने सहकार प्रशिक्षण घेण्यात यावे.
5. संगणक प्रणालीचे सिस्टीम ऑडीट करण्यात यावे.
6. संस्थेचे अधिकृत भाग भांडवल मर्यादा उल्लंघली असुन उपविधीमध्ये दुरुस्ती करण्यात यावी.

क) संस्थेने केलेली उत्कृष्ट / चांगली कामे.

1. संस्थेचे दप्तरी कामकाज संगणकीकृत केलेले आहे.
2. संस्थेची कर्ज वसुली समाधानकारक आहे.
3. संस्थेने मुंबई जिल्हा सहकारी बँक लि, यांचेकडुन कॅश क्रेडिट कर्ज घेतले असुन कर्ज व्याजाची नियमित परतफेड करीत आहे.

स्थळ : मुंबई
दिनांक : 30/07/2022

शांताराम तु. गव्हाणे
(प्रमाणित लेखापरिक्षक)
पॅनल क्र. बी-2/11386

COLLEGE OF ARTS & COMMERCE EMPL. CO-OP CREDIT SOCIETY LTD. * K.J. SOMAIYA
DECN. NO. BOM/WW/RSR/CR/1080

नमुना क्र.1

लेखापरिक्षण अहवाल (सर्व सहकारी संस्थांसाठी)

विभाग पहिला

	संस्थेचे नाव - के.जे. सोमय्या कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.	लेखापरिक्षण नोंदवही प्रमाणे लेखापरिक्षण अहवालाचा अनुक्रमांक
	नोंदलेला संपूर्ण पत्ता - के.जे. सोमय्या कॉलेज कॅम्पस, विद्याविहार (पूर्व), मुंबई - 400 077. **तालुका व गट** - मुंबई **संस्था नोंदणी क्रमांक** - बी.ओ.एम./डब्ल्युएन/आरएसआर/एसआर/1080/ सन 1992 **संस्था नोंदणी दिनांक** - दि. 09/03/1992	1) लेखापरिक्षा वर्गीकरण - ''अ'' 2) गत तीन वर्षात देण्यात आलेला लेखापरिक्षण वर्ग - ''अ'' ''अ'' ''अ''
	संस्थेचे कार्यक्षेत्र - के.जे. सोमय्या कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेजच्या आस्थापनातील कर्मचारी पुरते मर्यादित	
	संस्थेच्या शाखा, दुकाणे, आगार (डेपो) यांची संस्था	----
1	**लेखापरिक्षण माहिती**	
	1. लेखापरिक्षण करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव पदनाम :-	शांताराम तु. गव्हाणे प्रमाणित लेखापरिक्षक, सह. संस्था
	2. चालु लेखापरिक्षेत समावेश करण्यात आलेला कालावधी	दि.01/04/2020 ते 31/03/2021
	3. दिनांक : 1. लेखापरिक्षा सुरु केल्याचे 2. लेखापरिक्षा संपल्याचे 3. लेखापरिक्षा अहवाल सादर केल्याचा	दि. 20/07/2022 दि. 22/07/2022 दि. 30/07/2022
2	**सभासदत्व**	
	1. सभासद संख्या	
	अ) व्यक्तीगत 1. सर्वसाधारण : 2. नाममात्र : 3. हितचिंतक : ब) संख्या : क) अन्य (अन्य सदस्याची माहिती तपशीलवार द्यावी) एकूण	94 --- --- 94
	2) नवे सभासद यथोचितरित्या करुन घेतले आहेत काय ? त्याने प्रवेश शुल्क दिले आहेत काय ?	होय
	3) त्यांचे लेखी अर्ज घेण्यात आले असुन ते योग्य रितीने नियमात केले आहेत काय ?	होय
	4) महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या 1960 च्या कानुनातील नियम 31 आणि 65 (1) अन्वये ठरविलेल्या ''**आय**'' या नमुन्यात सभासदांची नोंदवही ठेवलेली आहे काय ?	होय, शेरे पहा
	5) महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या 1960 च्या कानुनातील नियम 33 अन्वये ''**जे**'' या नमुन्यात सभासदांची यादी ठेवलेली आहे काय ?	होय, शेरे पहा
	6) मृत काढुन टाकलेल्या या राजीनामा दिलेल्या सभासदांच्या बाबतीत त्यांच्या नावाप्रमाणे योग्य ती नोंद केली आहे काय ?	होय, शेरे पहा
	7) राजीनामे रीतसर आहेत काय आणि ते यथोचितरित्या स्वीकारले आहेत काय ?	होय
	8) महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या कानुनातील नियम 52 प्रमाणे वारस (नॉमिनी) नेमून दिले आहेत काय आणि त्याची नोंद 26 व्या	होय

	नियमाप्रमाणे सभासदांच्या नोंदवहीत यथोचितरित्या केली आहे काय ?	
3	**भाग**	
	1) भागांकरीता आलेले अर्ज बरोबर आहेत काय ?	होय
	2) भागांची नोंदवही अद्यावत लिहिली आहे काय ?	होय
	3) भागांची नोंदवह्यांतील नोंदी किर्दीतील नोंदीशी जुळतात काय ?	होय
	4) भागांची खतावणी अद्यावत लिहिली आहे काय ?	होय
	5) भागांची एकूण खतावणी बाकी ताळेबंदाला भाग भांडवलाच्या आकडयांशी जुळते काय ?	होय
	6) भागधारकांना त्यांनी घेतलेल्या सर्व भागांबद्दल भाग पत्रे दिली आहे काय ?	सर्व सभासदांना वाटप नाही.
	7) भागांचे हस्तांतरण (ट्रान्सफर) अगर त्यांची किंमती परत देणे या गोष्टी कायदा कानुन व पोटनियम यातील तरतुदीप्रमाणे झाल्या आहेत काय ?	होय, शेरे पहा
4	**बाहेरील कर्ज**	
	1) पोटनियमाप्रमाणे संस्थेने कर्ज घेण्याची मर्यादा काय ठरवली आहेत ?	नियम 35 प्रमाणे भाग अ मध्ये शेरा नमुद आहे.
	2) जर ती उल्लंघिली गेली आहे काय ?	नाही
	3) जर ती उल्लंघिली गेली असेल तर सक्षम अधिकाऱ्यांकडुन मिळवली आहे काय ?	नाही
5	**सभा**	
	1) दिनांक द्यावेत अ) वार्षिक सर्वसाधारण सभा ब) विशेष सर्वसाधारण सभा	 दि. 22/10/2021 ----
	2) लेखापरिक्षा कालावधी भरलेल्या सभांची खालीलप्रमाणे संख्या द्यावी. अ) व्यवस्थापक समितीच्या वा संचालक मंडळाच्या सभा ब) कार्यकारी वा उपसमिती सभा क) अन्य सभा	 14 --- ---
6	**दोष दुरुस्ती अहवाल**	
	1) संस्थेने गेल्या लेखापरिक्षा अहवालाचा दोष दुरु स्ती अहवाल पाठविला आहे काय ? असल्यास दिल्याचे दिनांक द्या नसल्यास ते न दिल्याबद्दलची कारणे द्या ?	अहवाल सादर केला नाही.
	2) मागील लेखापरिक्षण अहवालात नमूद केलेल्या काही महत्वाच्या मुद्यांकडे संस्थेने दुर्लक्ष केले आहे काय ? तसे असेल तर सर्वसाधारण अभिप्राय नमुद करा.	शेरे व सूचना पहा
7	**लेखापरिक्षा शुल्क**	
	1) शेवटच्या लेखापरिक्षा शुल्काची आकारणी रक्कम द्या. कोणत्या कालावधीसाठी आकारले तो कालावधी लिहा.	रु. 20873.00 2020-21
	2) जर संस्थेने लेखापरिक्षा शुल्क भरले नसेल तर येणे असलेल्या लेखापरिक्षा शुल्काचा तपशील व न भरल्याची कारणे द्या.	लागू नाही.
8	**अंतर्गत व स्थानिक लेखापरिक्षण**	
	1) जर अंतर्गत वा स्थानिक लेखापरिक्षा झाली असेल तर ती कोणी केली ? कोणत्या कालावधीसाठी केली व त्याच्या लेखापरिक्षा अहवाल	अंतर्गत लेखापरिक्षण केलेले नाही



	संस्थेच्या दप्तरी आहे काय ? या ची माहिती द्या.	
	2) संवधीक (स्टॅटयुटरी) लेखापरिक्षण व अंतर्गत लेखापरिक्षण यांच्यात समन्वय आहे काय ?	लागू नाही
9	**अ) कार्यकारी संचालक / व्यवस्थापक / चिटणीस**	
	1) अधिकाऱ्याचे नाव (**अध्यक्ष**)	डॉ. सत्यवान हानेगावे
	2) दरमहा घेतलेले वेतन/ वेतनश्रेणी	नाही
	3) त्यांना अन्य भत्ते आणि सवलती उदा. विनामुल्य निवासगृहे आदी उपलब्ध केल्या असल्यास त्या लिहा.	नाही
	4) ते संस्थेचे सभासद आहेत काय ते लिहा.	होय
	5) जर ते सभासद असतील तर कर्ज घेतले आहे काय ? किंवा त्यांना उधार-उचल सवलती दिल्या आहेत काय ? त्यांच्याकडील येणे रक्कमा द्या व त्यातील थकबाकी किती आहे ते लिहा.	कर्ज घेतलेले नाही
	6) अन्य कोणत्या रक्कमा त्यांच्याकडुन येणे असतील तर त्याचा तपशील द्या.	निरंक
	ब) कर्मचाऱ्यासंबंधी त्यांची नावे पदनामे शैक्षणिक पात्रता वेतन देण्यात येणारे भत्ते नेमणूकांचे दिनांक दिलेली अनामत आदी माहिती दाखविणारी यादी मिळवा.	कर्मचारी नाहीत
10	**उल्लंघन**	
	1) संस्थेजवळ आपले नोंदविलेले पोटनियम कायदा व कानुन याची प्रत आहे काय ?	होय
	2) कायदा कानुन व पोटनियम यांचे उल्लंघन झाल्यांच्या नोंद द्या. 1) कायदा कलम क्रमांक 2) कानुन क्रमांक 3) पोटनिसम क्रमांक	सामान्य शेरे व सूचना पहा
	3) पोटनियमानुसार काही नियम तयार केले आहे काय ? योग्य त्या अधिकाऱ्याकडुन ते मान्य केले आहे काय ? करुन घेतले त्याच्या प्रतीपालन योग्य रितीने होत आहे काय ? (उल्लंघनासंबधी सर्वसाधारण अभिप्राय थोडक्यात चर्चा करावी)	होय, शेरे पहा
11	**नफा आणि तोटा**	
	1) गेल्या सहकारी वर्षात किती नफा आणि तोटा झाला ?	रु.861756.00 (सन 2020-21)
	2) निव्वळ नफ्याची विभागणी कशी केली ते लिहा (निर्व्यवहारी नॉन बिझनेस) संस्थांच्या बाबतीत प्रश्नांक 11 (2) च्या उत्तरात वाढ वा घट यांच्या रक्कमा लिहाव्यात.	1. राखीव निधी - 215439.00 2. लाभांश - 466262.00 3. लाभांश समी. निधी - 100000.00 4. सभासद गिफ्ट - 5000.00 4. शिल्लक नफा - 75055.61
12	**रोकड रक्कमा, बँकेतील शिल्लक आणि गुंतवणूकी (सिक्युरीटीज)**	
	अ) रोकड रक्कमा :- 1) शिल्लक मोजा व शिल्लक मोजल्याचा दिनांक व रक्कम नमुद करुन सही करा.	रोजकिर्द अपूर्ण असल्यामुळे शिल्लक मोजता आली नाही.
	2) रोकड रक्कमा मोजावयास कोणी सादर केली त्याचे नाव व पदनाम लिहा, रोकड रक्कमा ठेवण्याबाबत त्यांना अधिकार आहे काय ?	रोजकिर्द अपूर्ण असल्यामुळे शिल्लक मोजता आली नाही.
	3) किर्दीप्रमाणे रोकड रक्कम बरोबर आहे काय ?	लागू नाही
	4) ने-आण करताना आणि तिजोरीत ठेवलेल्या शिल्लकेच्या	नाही

	रक्कमेच्या सुरक्षिततेबाबत केलेली व्यवस्था पुरेशी आहे काय ?	
	ब) बँकेतील शिल्लक :- बँकेचे पासबुकातील त्यांनी पाठविलेल्या पत्रातील बँकेने दिलेल्या दाखल्यातील शिल्लक रक्कम संस्थेच्या जमा खर्चाच्या बाक्यांशी जुळतात काय ? जर त्या जुळत नसतील तर मेळपत्रके बसवा.	होय
	क) गुंतवणूकी :- 1) गुंतवणूक रोखे प्रत्यक्षात पहा आणि ते प्रत्यक्षात संस्थेच्या नावावरच आहे काय ते पहा.	होय
	2) गुंतवणूकीवरील लाभांश व व्याज यथावत वसुल करण्यात येत आहे काय ?	होय
	3) जर गुंतवणूक रोखे बँकेत ठेवले असतील तर त्याबाबतचे संबंधीत दाखले मिळवीले आहेत काय ? व ती अद्यावत लिहिली आहे काय ?	होय
	4) गुंतवणूकीची नोंदवही ठेवली आहे काय ? व ती अद्यावत लिहिली आहे काय मिळवीले आहेत काय ? व ती अद्यावत लिहिली आहे काय ?	गुंतवणूक नोंदवही दप्तरी ठेवलेली नाही.
13	**स्थावर आणि जंगम मालमत्ता**	
	1) संबंधित नोंदवह्या ठेवल्या आहेत काय ?	नाही
	2) मालमत्तेची यादी घेवुन प्रत्यक्षात रुजवात घ्या ताळेबंदातील रकमेशी या वाक्या जमतात काय ?	लागू नाही
	3) जमीन आदी स्थावर मालमत्तेच्याबाबत त्यांचे विलेख (दस्ताऐवज पहा व ते संस्थेच्या नावावरच आहे काय ते पहा)	लागू नाही
	4) आवश्यक तेथे मालमत्तेचा अद्यावत विमा उतरविला आहे काय ?	नाही
	5) झीज (घसारा) 1) घसारा यथावत आकारला आहे काय ? 2) वेगवेगळया मालमत्तेवरील घसाऱ्याचे दर नमूद करा.	नाही
14	तुम्ही लेखापरिक्षा अहवालाच्या मुद्यासंबंधी संचालक मंडळ वा व्यवस्थापन समिती यांच्याशी चर्चा केली आहे काय ? नसल्यास त्यांची कारणे लिहा.	होय

स्थळ : मुंबई
दिनांक : 30/07/2022

शांताराम तु. गव्हाणे
(प्रमाणित लेखापरिक्षक)
पॅनल क्र. बी-2/11386

नमुना क्र.8

(पगारदार नोकरांच्या सहकारी संस्था) विभाग 2 रा

संस्थेचे नाव :- के.जे. सोमय्या कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

सन 2021-2022

1	**ठेवी व वर्गण्या :**	
1	अ) पोटनियमातील तरतुदीप्रमाणे वेतन आणि मजुरी यांतुन ठेवी आणि वर्गण्यांची काटेकोरपणे कपात करतात का ?	होय
	ब) वर्गण्यांचे नियमीतपणे भागांत रुपांतर केले जात आहे काय ?	होय
	क) ठेवींचा व्यवहार चालविण्यासाठी स्वतंत्र नियम तयार केले आहेत काय ?	नाही
	ड) त्यांचे योग्य रितीने अनुपालन होत आहे काय ?	होय
	इ) बिगर सभासदांकडुन काही ठेवी स्विकारल्या आहेत काय ?	नाही
2	व्यक्तीगत खात्यावरील बाक्या सर्वसाधारण खतावणीतील एकंदर खात्यांच्या बाक्यांशी जुळतात काय ?	होय
3	ठेवींची देय-काल नोंदवही ठेवली आहे काय आणि ठेवींची परतफेड वक्तशिरपणे करण्यात येत आहे काय ?	होय
4	ठेवींपोटी कर्जाऊ रक्कमा देण्यात येतात तेव्हा पोटनियम आणि या कारणासाठी तयार केलेले नियम यानुसार त्या काटेकोरपणे दिलेल्या आहेत काय ?	शेरे पहा
5	ठेव खात्यात दाखविलेल्या रक्कमांवरील व्याजाची आकारणी पडताळुन पहा. जर या तपासण्या शेकडेवारी पध्दतीवर केल्या असतील तर त्यांचे शेकडा प्रमाण लिहा.	होय 10 टक्के
2	**चल संपत्ती आणि व्यापार :**	
1	चल संपत्तीची तरतुद पुरेशी केली आहे का ते लिहा	लागू नाही
2	अ) चल संपत्ती दैनंदिन वा साप्ताहिक पध्दतीवर ठेवली आहे ते लिहा	लागू नाही
	ब) संस्थेची चल संपत्ती आणि सांपत्तिक स्थिती दर्शविणारी पत्रके योग्य त्या प्राधिकाऱ्याकडे ठराविक दिनांकास पाठविली जातात काय ?	लागू नाही
3	लेखापरिक्षा काळात भांडवलाच्या तरतुदीत काही कमतरता आढळल्या आहेत काय असल्यास अभिप्रायात विचार व्यक्त करा ?	लागू नाही
4	निबंधकांनी घालुन दिलेल्या प्रमाणाशी विचार करता संस्था जादा व्यवहार (ओव्हर ट्रेडिंग) करते काय ? असल्यास जादा झालेल्या व्यवहाराची मर्यादा लिहा.	नाही
3	**बाहेरील कर्जे :**	
1	जिल्हा सहकारी बँकेने वा शासनाने विविध कारणांच्या योजनाखाली दिलेली कर्जे अथवा पतमर्यादा यांच्या रक्कमा काय आहेत पुढीलप्रमाणे माहिती लिहा.	सीसी कर्जे 50.00 लाख दि.30/11/2022
2	संस्थेने मिळविलेल्या विविध कर्जाचा आणि पतमर्यादांचा व्यवहार समाधानकारक आहे का ?	होय
3	कर्जे वक्तशीरपणे परत केली आहेत काय ?	होय
4	कर्जासाठी घालुन दिलेल्या विविध शर्तीचे काटेकोरपणे अनुपालन होत आहे काय ?	शेरे पहा
4)	**कर्जे आणि आगाऊ दिलेल्या कर्जाऊ रक्कमा :**	
1	कर्जे आणि आगाऊ दिलेल्या कर्जाऊ रक्कमा यासाठी सभासदांकडुन आलेले अर्ज नियमानुसार आहेत का ?	होय
2	कर्जाच्या अर्जाची नोंदवही ठेवली असुन ती अद्यावत लिहिली आहे काय ?	शेरे पहा
3	पोटनियमानुसार, विविध प्रकारची कर्जे आणि कर्जापोटी द्यावे यांच्या कर्जाऊ रक्कमा यासाठी व्यक्तीगत आणि एकूण काय मर्यादा ठरविल्या आहेत ? त्या मर्यादा पाळल्या जातात काय ?	शेरे पहा

4	अ) सभासदांच्या परतफेडीच्या क्षमतेची योग्य चौकशी करुन त्यांची पत-पात्रता ठरविली आहे काय ? व्यवस्थापन समिती किंवा संचालक मंडळ यांनी स्विकारलेली विशिष्ट कसोटी लिहा.	होय
	ब) ठरवुन दिलेल्या नमुन्यात पात्रता अणि जामिन दायित्व नोंदवही ठेवली आहे काय ?	नाही
5	कायदा, कानु आणि पोटनियम यातील तरतुदीनुसार कर्जे काटेकोरपणे दिली आहेत काय ?	होय, शेरे पहा
6	संस्थेने मागणी, वसुली आणि बाकीची नोंदवही योग्य रीतीने ठेवली आहे काय ?	होय
7	योग्य चौकशी केल्यानंतर सुधार करण्यासाठी मुदतवाढी देण्यात येतात काय ? अशा मुदत वाढीसाठी आवश्यक तेथे जामिनदारांच्या संमतीपत्रासहित अर्ज मिळविले आहेत काय ?	अशी प्रकरणे नाहीत.
8	अ) सभासदांकडील थकबाक्या वसुल करण्यासाठी काय कारवाई केली आहे ते लिहा.	कारवाई नाही
	ब) मागणी आणि येणेबाकी यांच्याशी थकबाकीचे आणि शेकडा प्रमाण काय ?	1.04 %
9	संस्थेने करुन घेतलेले कर्ज रोखे, वचनचिठ्या आणि अन्य कागदपत्र नियमानुसार आहेत काय ? काही उणिवा असल्यास, नमुद करा.	शेरे पहा
10	1960 च्या महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या कायद्याच्या 49 व्या कलमानुसार सभासदांकडुन त्यांच्या पगारातुन व मजुरीतुन करारपत्रात मंजुर केलेल्या रक्कमा संस्थेच्या नावाने कपात केल्याबद्दल नोकरी देणाऱ्यास प्राधिकार देणारी करारपत्रे करुन घेतली आहेत काय ?	होय
11	परतफेड वक्तशिर आहेत काय ? संस्थेच्या मागण्या पुऱ्या करण्यासाठी नोकरी देणाऱ्यांना वेतन वा मजुरी यातुन मासिक कपाती नियमितपणे केल्या आहेत काय ?	होय
12	अशी कपात केलेली रक्कम नोकरी देणाऱ्याने संस्थेस वक्तशिरपणे दिली आहे काय ? न दिलेली एकूण रक्कम असल्यास लिहा.	होय
13	पूर्वीच्या कर्जाची परतफेड आणि नवीन कर्ज देणे यांत ठरवुन दिलेले कालांतर यथावत पाळले जाते काय ?	नाही
14	सभासदांना दिलेल्या पासबुकातील नोंदी वैयक्तिक खतावण्यातील नोंदीशी तपासुन पहा. अशा तपासलेल्या पासबुकातील संख्या लिहा ?	पासबुक दिले नाही.
15	थकलेल्या व्याजाची रक्कम किती आहे ? जर ती हिशोबात घेतली असेल तर तिची यथावत तरतुद केली आहे काय ?	पुरेशी तरतुद केलेली नाही.
16	संस्थेला येणे असलेले कर्जे तपासा आणि त्यांचे बुडित आणि संशयित असे वर्गीकरण झाले आहे काय ते पहा. अशा संशयित व बुडित कर्जासाठी पुरेशी तरतुद केली आहे काय ते तपासा.	होय
17	संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या वा संचालक मंडळाच्या सभासदांना आणि बँकांच्या अधिकाऱ्यांना दिलेल्या आणि येणे असलेल्या कर्जाच्या रक्कमा लिहा.	सोबत यादी जोडली आहे.
18	कालमानानुसार थकबाकी खालीलप्रमाणे वर्गीकरण करा	
	1. पाच वर्षावरील थकबाकी	थकबाकी नाही
	2. तीन वर्षावरील थकबाकी	थकबाकी नाही
	3. एक वर्षावरील थकबाकी	रु. 2,48,174.00
	4. एक वर्षाखालील थकबाकी	थकबाकी नाही
19	तारणानुसार थकबाकीचे वर्गीकरण करा.	नाही
	अ. जामिनदारांच्या हमीनुसार सुरक्षित आणि चांगली असलेली थकबाकी	
	ब. विमापत्रकान्वये सुरक्षित आणि चांगली असलेली थकबाकी	
	क. अन्य तारणामुळे सुरक्षित आणि चांगली असलेली थकबाकी	
	ड असुरक्षित आणि संभाव्य संशयित वा बुडित ठरणारी थकबाकी	
20	निबंधकांच्या नामनिर्देशित व्यक्तीकडे (नॉमिनीकडे) प्रलंबित असलेल्या आणि बजावणीसाठी पाठविलेल्या निवाडयांची (अॅवार्डस) संख्या त्यांच्या रक्कमेसह तपशिल देवुन लवाद दाव्यातील प्रकरणात अडकुन राहिलेली एकूण रक्कम द्या ?	लागू नाही

21	विविध प्रकारच्या कर्जावर आकारण्यात येणाऱ्या व्याजाचे दर नमुद करा ?	12 टक्के
22	दंडाचे व्याज आकारले जाते काय ? पोटनियमात ठरवुन दिले असल्यास दंडाच्या व्याजाचा दर लिहा.	2 टक्के
23	1960 च्या महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या कायद्याच्या कलम ४1 (2) मध्ये दर्शविल्याप्रमाणे येणे असलेली कर्जे, थकलेल्या रक्कमा, कोणत्या दिनांकापासुन थकल्या ते, त्या वसुल करण्यासाठी केलेली कारवाई इ. दर्शविणारी थकबाकीची यादी मिळवा आणि तपासा.	थकबाकी वसुलीसाठी कायदेशीर कारवाई केलेली नाही.
5)	**गुंतवणूकी :**	
1	कायदा, कानु व पोटनियम यांतील तरतुदीनुसार गुंतवणूकी केल्या आहेत काय ?	होय, शेरे पहा
2	गुंतवणूकीच्या अवमूल्यनासाठी पुरेशी तरतुद केली आहे काय ?	नाही
3	संस्थेच्या गुंतवणूकी दर्शविणारी नोंदवही अद्यावत ठेवली आहे काय ? गुंतवणूक विभागावरील जबाबदार अधिकाऱ्याने त्यावर सह्या केल्या आहेत काय ?	नोंदवही ठेवलेली नाही
4	गुंतवणूक नोंदवही संस्थेजवळ असलेल्या रोख्याशी तपासा.	नोंदवही ठेवलेली नाही
5	रोखे जर बँकेमध्ये ठेवले असतील तर बँकांची प्रमाणपत्रे (बँकर्स सर्टीफिकेटस) मिळविली आहेत काय ?	नाही
6)	**खर्च :**	
1	खर्चाची पत्रके संचालक मंडळ व व्यवस्थापन समिती यांच्या मंजुरीसाठी ठेवतात काय ?	होय
2	अ. वार्षिक अंदाजपत्रके तयार करुन त्यास संचालक मंडळ वा व्यवस्थापन समिती आणि साधारण सभा यांनी मंजुरी दिली आहे काय ?	नाही
	ब. झालेल्या खर्च अंदाजपत्रकाच्या मर्यादेतच आहे काय ? नसल्यास, साधारण सभेने पुनर्विनियोजना (रिॲप्रोप्रिएशन) मान्यता दिली आहे काय ?	अंदाजपत्रक तयार केले नाही
3	संस्थेच्या व्यवहाराशी संबंध नसलेल्या खर्चाच्या प्रकरणांची सर्वसाधारण अभिप्रायात नोंद करा ?	असे खर्च नाही मात्र नफा विभागणीतुन भेटवस्तुसाठी खर्च केलेला आहे.
4	संस्थेने नगरांत दूरध्वनी नोंदवही ठेवली आहे काय ? खाजगी दूरध्वनीचा खर्च वसुल करण्यात येतो काय ?	नाही
5	खेळत्या भांडवलाशी आणि निव्वळ उत्पन्नाशी (मिळालेल्या व्याजातुन दिलेले व्याज वजा जाता) व्यवस्थापन खर्चाचे शेकडा प्रमाण लिहा.	खेळत्या भांडवलाशी 0.41 % निव्वळ उत्पन्नाशी 8.17 %
7)	**अंतर्गत तपासणी**	
1	संस्थेतील अंतर्गत तपासणीची व्यवस्था समाधानकारक आहे काय ?	तपासणी केलेली नाही.
2	संस्थेने लेखापरिक्षकाची नेमणूक केली आहे काय ? त्यांना दिलेल्या लेखापरिक्षा शुल्काची रक्कम आणि गेल्या लेखापरिक्षेचे वेळी तपासलेला कालखंड लिहा.	नेमणूक केलेली नाही
8)	**व्यवस्थापन :**	
	अधिलाभांशाच्या कायद्यानुसार कर्मचारी वर्गाला द्यावयाच्या अधिलाभांशाची पुरेशी तरतुद संस्थेने केली आहे काय ?	लागू नाही

स्थळ : मुंबई
दिनांक : 30/07/2022

शांताराम तु. गव्हाणे
(प्रमाणित लेखापरिक्षक)
पॅनल क्र. बी-2/11386

(15)

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम 81 (2) अन्वये नऊ मुद्यांवर द्यावयाचे शेरे.

संस्थेचे नाव :- के.जे. सोमय्या कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

सन 2021-2022

अ.क्र.	मुद्यांचा तपशील	शेरा
1	कोणतीही कर्जे असल्यास त्याच्या बऱ्याच काळ थकलेल्या रक्कमा	शेरे पहा
2	रोख शिल्लक व कर्जे रोखे आणि संस्थेच्या मालमत्ता व दायित्वे यांचे मूल्यांकन	शेरे पहा
3	प्रतिभुतीच्या आधारे संस्थेने दिलेले कर्जे व आगावू रक्कमा आणि घेतलेली कर्जे योग्य प्रकारे प्रतिभुत करण्यात आलेली आहेत किंवा कसे आणि अशा तऱ्हेने दिलेली कर्जे किंवा आगावू रक्कमा किंवा घेतलेली कर्जे ज्या अटीवर देण्यात वा घेण्यात आली असतील त्या अटी संस्थेला व तिच्या सदस्यांच्या हित संबंधांना बाधक ठरणाऱ्या आहेत केंवा कसे ?	होय नाही
4	केवळ पुस्तक नोंदीव्दारे संस्थेकडुन केले जाणारे संव्यवहार संस्थेच्या हितसंबंधाला बाधक ठरणारे आहेत किंवा कसे ?	नाही
5	संस्थेने दिलेली कर्जे व आगावू रकमा ठेवी म्हणुन दाखविण्यात आल्या आहेत काय ?	नाहीत
6	वैयक्तिक खर्च महसुली लेख्यांवर भारीत करण्यात आला आहे काय ?	नाही
7	आपली उद्दिष्टे साध्य करताना संस्थेला काही खर्च झाला आहे काय ?	व्यवस्थापन खर्च
8	शासन किंवा शासकीय उपक्रम अथवा वित्त संस्था यांनी संस्थेला ज्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी सहाय्य दिलेले असेल त्यांच्यासाठी या सहाय्याचा योग्य प्रकारे वापर संस्थेने केला आहे काय ?	होय, जिल्हा बँक सी.सी. कर्ज
9	संस्था सदस्यांबाबतचे आपली उद्दिष्टे व जबाबदाऱ्या योग्य प्रकारे पार पाडत आहे किंवा कसे ?	होय

स्थळ : मुंबई
दिनांक : 30/07/2022

शांताराम तु. गव्हाणे
(प्रमाणित लेखापरिक्षक)
पॅनल क्र. बी-2/11386

के.जे. सोमय्या कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.
वैधानिक लेखापरिक्षण अहवाल
(दि.01/04/2021 ते 31/03/2022)

विभाग - अ

1. प्रस्तावना :-

के.जे. सोमय्या कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम 1961 अंतर्गत नोंदणीकृत सहकारी संस्था असुन संस्थेचा नोंदणी क्रमांक बी.ओ.एम./डब्ल्युएन/आरएसआर/ एसआर/1080/ सन 1992 आहे. संस्थेच्या मुख्यालया व्यतिरिक्त 00 शाखा आहेत. संस्थेच्या दिनांक 01/04/2021 ते 31/03/2022 या कालावधीच्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी संस्थेने त्यांचे दिनांक 22/10/2021 रोजी पार पडलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील ठराव क्रमांक 04 अन्वये वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन माझी नियुक्ती केलेली आहे. संस्थेच्या उक्त कालावधीचे लेखापरिक्षण, संस्थेने पुरविलेल्या लेखी दस्तऐवज व तोंडी माहिती व खुलाशाच्या आधारे पूर्ण केलेले आहे. लेखापरिक्षणासाठी आवश्यक असणारे सर्व रेकॉर्ड व माहिती संस्थेने लेखापरिक्षणावेळी आम्हास उपलब्ध करुन दिलेले आहे. लेखापरिक्षण कालावधीत संस्थेचे चेअरमन म्हणुन श्री. सत्यवान एस. हानेगावे यांनी व सरचिटणीस म्हणुन श्री. संजय चौगुले आणि खजिनदार म्हणुन श्री. अनिल बी. गवारे यांनी कामकाज पाहिलेले आहे.

लेखापरिक्षण अहवाल तीन विभागात म्हणजेच अ, ब, क मध्ये देण्यात आला आहे. विभाग अ मध्ये महत्वाच्या व धोरणात्मक बाबींबाबत, विभाग ब मध्ये संस्थेची आर्थिक स्थिती व ताळेबंद विवेचन याबाबत आणि विभाग क मध्ये कर्जरोखे व खर्च प्रमाणके इत्यादी बाबत दोष याप्रमाणे शेरे नमुद केले आहेत.

तपासणीस सादर केलेल्या दप्तरी कामकाजाव्यतीरिक्त संस्थेच्या वतीने इतर काही व्यवहार केले असल्यास व भविष्यात अशा व्यवहाराबाबत काही गैरव्यवहार निदर्शनास आल्यास अशा व्यवहारास संचालक मंडळास जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच लेखापरिक्षण कालावधीमध्ये आर्थिक अनियमीतता, निधीचा दुरुपयोग, अपहार किंवा लबाडी दिसुन आलेली नाही.

2. सुधारीत आदर्श उपविधी :-

संस्थेने सुधारीत आदर्श उपविधी (2013) स्विकारलेला असुन मंजुरीची प्रत दप्तरी आहे.

3. सन 2020-2021 चे लेखापरिक्षण अहवाल :-

संस्थेचे सन 2020-2021 चे वैधानिक लेखापरिक्षण लेखापरिक्षक शांताराम तु. गव्हाणे (प्रमाणित लेखापरिक्षक) यांनी पूर्ण केले आहे. सदरहु अहवाल संस्थेस दि. 07/10/2021 रोजी सादर केला असुन निबंधक कार्यालयाकडे दि.13/11/2021 रोजी सादर केलेला असुन पोहच संस्थेच्या दप्तरी आहे.

4. कार्यालय जागा :-

संस्थेचे कार्यालय के.जे. सोमय्या कॉलेज कॅम्पस, विद्याविहार (पूर्व), मुंबई - 400 077. या पत्त्यावर कार्यरत आहे.

5. दोष दुरुस्ती अहवाल :-

संस्थेचे सन 2020-2021 चे वैधानिक लेखापरिक्षण लेखापरिक्षक शांताराम तु. गव्हाणे (प्रमाणित लेखापरिक्षक) यांनी पूर्ण केले आहे. संस्थेने वरील कालावधीच्या लेखापरिक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल सादर केलेला नाही. त्यामुळे मागिल लेखापरिक्षण अहवालातील दोष या अहवालात कायम करण्यात येत आहे.

तरी लेखापरिक्षण अहवालात नमुद सर्व दोषांची पूर्तता मुदतीत करण्याची दक्षता सचिव व संचालक मंडळाने घ्यावी व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 82 व नियम 73 प्रमाणे संपूर्ण दोषांची पूर्तता करुन दोष दुरुस्ती अहवाल लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासुन तीन महिन्याच्या आत सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

6. संस्थेचे व्यवस्थापन :-

संस्थेचे पोटनियम क्र. फ 1-1 अन्वये संस्थेच्या संचालक मंडळ सदस्य संख्या 11 आहे. संस्थेच्या व्यवस्थापन कमिटीचा कार्यकाल सन 2015-16 ते 2020-21 या पाच वर्षे कालावधीकरीता असुन तपासणी कालावधीमध्ये खालील सदस्यांनी कामकाज पाहिले आहे.

अ.क्र.	संचालकांचे नाव	पद
1	डॉ. सत्यवान सुधाकरराव हानेगावे	अध्यक्ष
2	श्री. अतिश सोमशेखर तौकरी	उपाध्यक्ष
3	श्रीम. प्रमिला शेट्टीगर	सचिव
4	श्री. अनिल बाळकृष्ण गवारी	खजिनदार
5	श्री. संदिप शंकरराव कुलकर्णी	सदस्य
6	श्रीम. रोसीली पौलोस	सदस्य
7	श्री. विजय तुकाराम कडु	सदस्य
8	श्री. निलेश पुष्पकुमार पेंडणेकर	सदस्य
9	श्री. अमित मोंडे	सदस्य
10	श्री. दिपक कणबी	सदस्य
11	श्रीम. उर्मिला प्रशांत आगवणे	सदस्य

संस्थेच्या संचालक मंडळाची मुदत संपल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणुक नियम 2013 यांच्या नियम 19 प्रमाणे राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा. प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी तथा, उपनिबंधक, सहकारी संस्था, एन विभाग, मुंबई यांनी संस्थेची पंचवार्षिक निवडणुक घेणेकरीता प्राधिकृत अधिकारी (निवडणुक निर्णय अधिकारी) म्हणुन श्री. अतुल विनायक मोरे (सहाय्यक सहकारी अधिकारी अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था एन विभाग, मुंबई) यांची नेमणूक केली. संस्थेच्या सन 2022-23 ते 2026-27 या पाच वर्षे कालावधीकीता श्री. अतुल मोरे (निवडणुक निर्णय अधिकारी) यांनी निवडणुक कार्यक्रम जाहिर केलेला होते. संस्थेची वरील कालावधीची निवडणुक बिनविरोध झाल्यामुळे नियम इ-9 नियम 32 नुसार निवडणुक निकाल दि. 16/03/2022 रोजी जाहिर केला आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे उमेदवार निवडुन आलेले आहे.

अ.क्र.	निवडुन आलेल्या उमेदवाराचे नावे	मतदारसंघाचे नाव
1	श्री. संदिप दिगंबरराव यादव	सर्वसाधारण
2	श्री. अनिल बाळकृष्ण गवारे	सर्वसाधारण
3	श्री. निलेश पुष्पकुमार पेंडणेकर	सर्वसाधारण

4	श्री. सत्यवान सुधाकरराव हाणेगावे	सर्वसाधारण
5	श्री. संजय नारायण चौगुले	सर्वसाधारण
6	श्री. सचिन शेषराव नरवडे	सर्वसाधारण
7	श्रीम. उर्मिला प्रशांत आगवणे	महिला राखीव
8	श्रीम. पल्लवी प्रशांत घाटगे	महिला राखीव
9	श्री. सुनिल भास्कर चंदनशिवे	अनुसूचित जाती / जमाती
10	श्री. अमित बापु मोंडे	इतर मागासवर्गीय
11	श्री. अर्जुन वसाराम राठोड	विमुक्त जाती / भटक्या जमाती / विशेष मागासवर्गीय प्रवर्ग

संस्थेची दि. 26/03/2022 रोजी झालेल्या सभेत खालीलप्रमाणे पदाधिकारी निवड करण्यात आली.

अ.क्र.	सदस्याचे नाव	पद
1	श्री. सत्यवान सुधाकरराव हाणेगावे	अध्यक्ष
2	श्री. संजय नारायण चौगुले	सचिव
3	श्री. अनिल बाळकृष्ण गवारे	खजिनदार
4	श्रीम. उर्मिला प्रशांत आगवणे	संचालिका
5	श्री. संदिप दिगंबरराव यादव	संचालक
6	श्री. सचिन शेषराव नरवडे	संचालक
7	श्री. सुनिल भास्कर चंदनशिवे	संचालक
8	श्रीम. पल्लवी प्रशांत घाटगे	संचालिका
9	श्री. निलेश पुष्पकुमार पेंडणेकर	संचालक
10	श्री. अमित बापु मोंडे	संचालक
11	श्री. अर्जुन वसाराम राठोड	संचालक

7. संचालक सदस्यांचे बंधपत्र :-

व्यवस्थापक समितीने तिच्या कालावधीत संस्थेच्या कामकाजाशी संबंधीत असे जे निर्णय घेतले असतील अशा सर्व निर्णयासाठी समितीचे सदस्य संयुक्तपणे व पृथ्थकपणे जबाबदार असतील. संस्थेच्या हितास हानी पोहोचविनाऱ्या सर्व कृती व प्रतीकृतींना समितीचे सदस्य संयुक्तपणे व पृथ्थकपणे जबाबदार असतील अशा आशयाचे बंधपत्र पदग्रहण केल्याचे दिनांकापासुन 15 दिवसाचे आत शासनाने विर्निदिष्ट केलेल्या नमुन्यात लिहुन देणे म.स. संस्था कायदा कलम 73 पोटकलम 1 क ख नुसार बंधनकारक आहे. बंधपत्र तपासणीसाठी उपलब्ध झालेली नाही.

8. प्रशिक्षण :-

मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक जा.क्र. एडीटी/ना.पतसंस्था/ लेप /02 /1176 दि. 16/09/2002 अन्वये संचालक व कर्मचाऱ्यास प्रशिक्षित होणे आवश्यक आहे. तपासणी कालावधीत संस्थेचे संचालक यांनी सहकार प्रशिक्षण घेतलेले नाही.

S. T. GAVHANE
P. No. 11386
Certified Auditor

9. संचालक मंडळ व नातेवाईक कर्ज -

31 मार्च 2022 अखेर संचालक मंडळ व नातेवाईक कर्जाचा तपशील सोबत जोडलेला आहे. त्यानुसार संचालक मंडळ व नातेवाईक यांचे 31 03.2022 अखेर एकूण रु. 20,28,830.00 एवढे कर्ज शिल्लक असुन एकूण कर्जाशी प्रमाण 8.55 टक्के आहे.

10. सभा व सभावृत्तांत :-

अ. वार्षिक सर्वसाधारण सभा -

संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि.22/10/2021 रोजी घेण्यात आली असुन या सभेला 59 सभासद हजर होते. या सभेमध्ये खालीलप्रमाणे उणिवा दिसुन येतात :-

1. मागिल लेखापरिक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल सादर केला नसुन वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये वाचन व मंजुरीसाठी ठेवलेला नाही.
2. संचालक व नातेवाईक कर्जाची माहिती सभेपुढे ठेवलेली नाही.
3. अंदाजपत्रक तयार करुन सभेपुढे मंजुरीसाठी ठेवलेले नाही.

ब. संचालक मंडळ सभा -

अहवाल सालामध्ये संस्थेच्या संचालक मंडळाच्या एकूण 14 सभा झाल्या आहेत. तसेच संचालक मंडळाने कर्ज वाटपास मंजुरी देणे, सहकार खाते पत्रव्यवहार, जमा खर्चास मंजुरी देणे, इ. विषयांवर चर्चा करुन निर्णय घेणे इ. कामकाज केलेले दिसुन येते. परंतु इतिवृत्त नोंदवहीमध्ये खर्चाची सविस्तर नोंद व थकबाकी वसुलीबाबत चर्चा करणे आवश्यक होते. तसेच सतत तीन सभांना गैरहजर असणाऱ्या सदस्यांवर उपविधीतील तरतुदीनुसार कारवाई करण्यात यावी.

तसेच लेखापरिक्षण कालावधीमध्ये संस्थेने उपसमितीची नेमणूक केलेली नाही.

11. मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. (कॅश क्रेडिट कर्ज) :-

संस्थेला अहवाल सालामध्ये मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. कडुन मुंबै बँक/ कर्ज विभाग/ फा-2183/2021-2022/6667 दि. 30.11.2021 नुसार कॅश क्रेडिट रु. 50.00 लाख दिनांक 31.08.2022 अखेरच्या मुदतीत 10.40 % व्याज दराने मंजुर केले आहे. त्याप्रमाणे 31.03.2022 अखेर सदर खात्यावर रु. 35,01,330.03 बँक शिल्लक दाखल्यानुसार बरोबर असुन अहवालासोबत बँक शिल्लक दाखला व कर्ज मंजुरीची प्रत जोडत आहे.

12. माहिती विवरण पत्रे (कलम 79 अे) -

नागरी सहकारी पतसंस्थांना एम.आय.एस. विषयक माहिती सादर करण्याबाबत मा. सहकार आयुक्त व निबंधक, म.रा. पुणे यांचे परिपत्रक जा.क्र. ना.बँका/ डी-4 /एम.आय.एस./ ना. पत/ 02 दि.01.12.2002 व उपविधी 68 अ नुसार विहित नमुन्यात दरमहा माहिती सादर करावयाची आहे. त्यानुसार संस्थेने ऑनलाईन माहिती सादर केलेली नाही. महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा अधिनियम 1960 मध्ये झालेल्या बदलानुसार सदर संस्थेच्या कार्याचा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखापरिक्षक यांनी लेखापरिक्षीत केलेली विवरणपत्रे तसेच संस्थेच्या अधिमंडळाने मान्यता दिलेल्या शिल्लक रक्कमेचा विनियोग करण्यासाठीच्या योजना अशी सर्व विवरण पत्रे मा. निबंधक यांच्या कार्यालयास सादर करण्यात यावीत. सदर विवरण पत्रे वैधानिक स्वरुपाची असल्याने

संस्थेने त्यांची नोंद स्वतंत्र रजिस्टरमध्ये करावी. आर्थिक वर्षे संपल्यावर 6 महिन्यात निबंधक कार्यालयाकडे खालील विवरणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. तसेच यामध्ये कोणताही दोष त्रुटी किंवा निष्काळजीपणा निदर्शनास आल्यास प्रचलित कायदा नियम यातील तरतुदीनुसार करावाई करण्यात येईल याची नोंद संचालक मंडळाने घेण्यात यावी.

1. संस्थेच्या मागिल वर्षातील कार्याची माहिती.
2. लेखापरिक्षीत आर्थिक पत्रके व नफा वाटणी.
3. उपविधी दुरुस्ती असल्यास त्याची माहिती.
4. वार्षिक सभेची दिनांक तसेच त्या वर्षात निवडणुक असल्यास त्याची दिनांक व तपशिल
5. निबंधकाने कायदा, नियम व उपविधी अनुसरुन विचारलेली इतर माहिती.
6. लेखापरिक्षकाची नेमणूक व त्यांचे संमतीपत्र

13. रोखता (C.R.R.) व तरलता (S.L.R.) :-

अ. रोखता :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1961 मधील नियम 107 क व सुधारीत आदर्श उपविधी अ 52 (1) नुसार संस्थेने राखीव रक्कम म्हणुन प्रत्येक मागिल तिमाही अखेरच्या एकूण ठेवीच्या एक टक्यापेक्षा कमी नसेल इतकी रक्कम लगतचे प्रत्येक तिमाहीसाठी दैनंदिन पध्दतीवर रोख तरलता ठेवणे बंधनकारक आहे त्यानुसार संस्थेने पूर्तता करावी. तसेच प्रत्यक्षात ठेवलेल्या दैनंदिन रोख तरलतेच्या रक्कमेमध्ये एकूण रोख शिल्लक 50 टक्यापेक्षा जास्त असणार नाही याची दक्षता घेतली आहे. तसेच संस्थेने रोख तिजोरीतील तसेच मार्गस्थ रक्कमेचा विमा उतरविलेला नाही.

31.12.2021 अखेर एकूण ठेवी	31.03.2022 रोख शिल्लक	31.03.2022 बँक शिल्लक	31.03.2022 अखेर रोख तरलता	1 टक्केप्रमाणे आवश्यक रोख तरलता	कमी /जादा
11574388.00	106047.00	59820.00	165867.00	115743.00	(+) 50124.00

31 मार्च 2022 अखेर संस्थेने रु.50124.00 जास्त रोखता ठेवलेली आहे.


ब. तरलता :

मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयीन परिपत्रकीय सूचनेनुसार उपलब्ध निधीच्या कमाल 30 ते 35 टक्के तरलता रक्कमेची जि.म.सह. बँकेत अथवा शासकीय कर्ज रोख्याच गुंतवणूक करणे बंधनकारक आहे. संस्थेने 31 मार्च 2022 अखेरच्या ताळेबंदाप्रमाणे संस्थेने तरलतेपोटी गुंतवणूक केलेली नाही. ती करण्यात यावी.

14. उपलब्ध निधीचा विनीयोग :-

31 मार्च 2022 अखेर संस्थेच्या ताळेबंदानुसार खालीलप्रमाणे संस्थेकडे निधी उपलब्ध आहेत.

अ.क्र.	तपशिल	रक्कम (रु.)
1	वसुल भाग भांडवल	70,44,700.00
2	ठेवी	1,10,40,095.00
3	बाहेरील कर्ज (सीसी कर्ज)	35,01,330.00
	एकूण उपलब्ध निधी	**2,15,86,125.00**



संस्थेकडे उपलब्ध निधी रु. 21586125.00 आहे. तर एकूण येणे कर्ज रु. 23724983.00 असुन उपलब्ध निधीचे प्रमाण 90.98 टक्के इतके आहे. सदरहु प्रमाण 65 ते 70 टक्के राखण्यात यावे.

15. बाहेरील कर्जमर्यादा :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे नियम 35 नुसार कर्ज काढण्याच्या बाबतीत शर्तीनुसार संस्थेने उभारलेल्या ठेवीची जबाबदारी संस्थेने पत्करलेली आहे. संस्थेची खालीलप्रमाणे बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादा आहे.

1. वसुल भाग भांडवल :- रु. 70,44,700.00
2. गंगाजळी :- रु. 18,57,187.00
3. इमारत निधी :- रु. 00.00

एकूण :- रु. 89,01,887 x 10 पट = 8,90,18,870.00

संस्थेकडे ठेवी रु. 1,10,40,095.00 व बँक कर्ज रु.35,01,330.00 असे एकूण रु. 1,45,41,425.00 आहेत. त्यामुळे मर्यादेचे उल्लंघन नाही.

16. अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए. तरतुद) :-

मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक जा.क्र./ना.बँका/डी-4/ पतसंस्था/ एन.पी.ए. /809/सन 2005 दि.09/05/2005 अन्वये नागरी पत/पगारदार संस्थेस दि. 31/03/2006 रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षापासुन सर्व नागरी/ पगारदार संस्थेस एन.पी.ए. नॉर्म लागू करण्यात आला आहे.

परंतु महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचे पत्र जा.क्र. पतसंस्था/ सआ-5/नियामक मंडळ/एनपीए कालावधी/ शिथिल/ सन 2022 दिनांक - 17/03/2022 नुसार खालीलप्रमाणे वर्गवारी करण्यात आलेली आहे.

त्यानुसार संस्थेने 31/03/2022 अखेरचा निष्क्रिय जिंदगी दाखविणारा तक्ता लेखापरिक्षणाच्या वेळी सादर केलेला आहे.

अ.क्र.	मालमत्तेचे वर्गीकरण	खाते क्रमांक	येणे बाकी	शेकडा तरतुद	एकूण तरतुद	येणे व्याज
1	2	3	4	5	6	7
अ	उत्पन्न देणारी कर्ज (0 ते 9)		2,28,13,109.00	0.25 टक्के	57,033.00	
ब 1	अनियमित कर्जे (9 ते 21)		0.00	5 टक्के	0.00	
ब 2	संशयित कर्जे					
	1. तारणी (21 ते 45)		9,11,874.00	10 टक्के	91187.00	
	1. विनातारणी		0.00	50 टक्के	0.00	
	2. तारणी (45 ते 57)		0.00	15 टक्के	0.00	
	2. विनातारणी		0.00	50 टक्के	0.00	
	3. तारणी (57 चे पुढे)		0.00	20 टक्के	0.00	
	3. विनातारणी		0.00	50 टक्के	0.00	
	एकूण संशयित कर्जे		0.00		0.00	
ब 3	बुडीत कर्जे		0.00	100 टक्के	0.00	
	एकूण		0.00		0.00	
क	अफरातफरीच्या रक्कमा			100 टक्के		
ड	ठेव खात्यावरील नावे रक्कमा			100 टक्के		
	एकूण एन.पी.ए. (ब क ड)		9,11,874.00		1,48,220.00	

अनुत्पादीत कर्जाचे प्रमाण :-

अ.क्र.	तपशिल	रक्कम (रु.)
1	एकूण कर्ज तपशिल (यादीनुसार)	2,37,24,983.00
2	एकूण अनुत्पादीत कर्ज (ढोबळ एन.पी.ए.)	9,11,874.00
3	एकूण अनुत्पादीत कर्जाचे एकूण कर्जाशी प्रमाण (2/1 × 100)	**3.84 टक्के**
4	वजावट :- थकीत व्याज तरतुद	
	नफा- तोटा खात्यातुन निर्माण केलेली थकीत व्याज तरतुद	
	एन.पी.ए. खात्यापोटी अनामत खात्याला जमा असलेल्या रक्कमा	
	एकूण वजावट	
5	एकूण संशयित बुडित कर्ज तरतुद (एन.पी.ए. तरतुद)	17,50,000.00
6	निव्वळ कर्ज (1-4-5)	2,19,74,983.00
7	निव्वळ अनुत्पादीत कर्ज (निव्वळ एन.पी.ए.) (2-4-5)	(-)8,38,126.00
8	निव्वळ अनुत्पादीत कर्जाचे निव्वळ कर्जाशी प्रमाण (7/6 × 100)	**0.00 टक्के**

संस्थेने दि.31 मार्च 2022 अखेरची वरील आकडेवारी पाहता संशयित व बुडित कर्जासाठी एकूण रु.17,50,000.00 एवढी तरतुद केलेली आहे. सदरची तरतुद रु.1,48,220.00 लाख एवढी करणे आवश्यक आहे. संस्थेने रु .16,01,780.00 एवढी जादा तरतुद केलेली आहे. संस्थेचा ढोबळ एन.पी.ए. 3.84 टक्के व निव्वळ एन.पी.ए. 0.00 टक्के आहे. सदरहु बाब चांगली आहे.

17. ठेवी व कर्जावरील व्याज दराबाबत (ए.एल.आर. व ए.बी.आर.)

मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे -1 यांचे परिपत्रक क्र. जा.क्र. ना. बँका/ डी 4/ पतसंस्था/ कर्ज-ठेवी/ व्याज दर/ 08 दि. 12/11/2008 नुसार संस्थेचे 31 मार्च 2022 अखेर ठेवी व कर्जावरील व्याज दर खालीलप्रमाणे आहेत.

1. **ए.बी.आर. ठेवीचा सरासरी दर** = वर्षभरात ठेवीवर दिलेले व्याज X 100 / वर्षभरातील ठेवींची सरासरी
   = 10,61,776 X 100 / 1,08,08,456
   = **9.82 टक्के**
2. **ए.एल.आर. ठेवीचा सरासरी दर** = वर्षभरात कर्जावर मिळालेले व्याज X 100 / वर्षभरातील कर्जाची सरासरी
   = 29,29,883 X 100 / 2,51,16,283
   = **11.67 टक्के**

3.	ए.एल.आर.	-	ए.बी.आर.	=	दुरावा
	11.67	-	9.82	=	1.85

31 मार्च 2022 अखेर 1.85 टक्के दुरावा असुन सदर दुरावा 3 टक्केपर्यंत राखण्यात यावा.

P. No. 116003

18. सी.डी. रेशो

कर्ज वाटपास उपलब्ध निधी

अ.क्र.	तपशिल	रक्कम (रु.)
अ	वसुल भाग भांडवल	70,44,700.00
	अ. राखीव निधी	18,57,187.00
	ब. इमारत निधी	0.00
	क. लाभांश समीकरण निधी	1,60,500.00
	ड. उत्तम जिंदगीवरील तरतुद	57,033.00
	इ. नफा विभागणीतुन काढलेला व कोणताही बाह्य देयता भागविण्यासाठी नसणारा निधी	2,35,000.00
	ई. बँक सीसी कर्ज	35,01,330.00
	चालु सालातील नफा	9,08,069.00
	एकूण (अ)	**1,37,63,819.00**
ब	वजा	
1	स्थावर जिंदगी व जंगम मालमत्ता	0.00
2	शेअर्समधील गुंतवणूक	10,52,000.00
3	राखीव निधी	18,57,187.00
	एकूण (ब)	**29,09,187.00**
	कर्ज वाटपास उपलब्ध निधी (अ-ब)	**1,08,54,632.00**

सी.डी. रेशो = कर्जे (-) कर्ज वाटपास उपलब्ध निधी X 100
ठेवी

= 2,37,24,983 (-) 1,08,54,632 X 100
1,10,40,095

= 116.57 टक्के

31 मार्च 2022 अखेर संस्थेच्या सी.डी. रेशो चे प्रमाण 116.57 टक्के इतके आहे. सीडी रेशो चे प्रमाण 65 ते 70 टक्के राखण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

19. थकबाकी -

दि. 31/03/2022 अखेर एकूण रु. 2,48,174.00 कर्ज थकबाकी असुन एकूण येणे कर्जाशी थकबाकीचे प्रमाण 1.04 टक्के येते. थकबाकी वसुलीसाठी थकबाकी कर्जदारांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

20. इ.डी.पी. लेखापरिक्षण -

संस्थेचे सर्व कामकाजाचे संगणकीकरण केलेले आहे. संगणकीय कार्यक्रम योग्य असणे आवश्यक आहे. संस्थेने याबाबतचे लेखापरिक्षण सीसाधारक या प्रमाणित लेखापरिक्षकाकडुन तपासणी करुन घेतलेले नाही. त्यामुळे संगणकीकृत कार्यक्रमात कोणते बदल आवश्यक आहेत. कोणत्या चुका आहेत याबाबतचा आढावा घेता आला नाही. त्यामुळे संगणक प्रणालीत काही दोष वा चुकीची माहिती सादर झाल्यास त्याची जबाबदारी संचालक मंडळावर राहिल याची नोंद घ्यावी.

21. कर व विवरण पत्र -

अ. संस्था व कर्मचारी व्यवसाय कर -

महाराष्ट्र शासन वित्त विभागाने सन 2002 च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.20 दि. 02/05/2002 अन्वये कर अधिनियम 1975 मध्ये सुधारणा करुन सुची क्र. 16 नुसार सर्व सहकारी संस्थांना व्यवसाय कर लागु केला आहे. त्यानुसार सर्व सहकारी संस्था व्यवसाय कर भरतात किंवा नाही हे पाहणे बाबत मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था म.रा. पुणे यांनी जा.क्र. प्रशासन/सहकारी संस्था/व्यवसाय कर/2002 दि.01/07/2002 अन्वये परिपत्रक निर्गमित केले आहे.

